कार्यकारी सारांश

एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाचा प्रस्तावित ब्राऊनफील्ड प्रकल्पाचा

येथे

गट नं. 2148, पोस्ट येळावी, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगली,महाराष्ट्र-416319

प्रकल्पाचा प्रकार	ब्राऊनफिल्ड प्रकल्प
EIA अधिसूचना 2006 नुसार श्रेणी	बाब नं, (5)., रासायनिक खते, श्रेणी ब
प्रकल्पाची किंमत	रु. 17.07 करोड
विस्तारानंतर उत्पादन क्षमता	SSP – 300 MTPD GSSP – 200 MTPD
हंगाम आणि प्रयोगशाळेवर देखरेख करणेः	डिसेंबर, 2020-फेब्रुवारी, 2021
TOR पत्र क्रमांक.	SIA/MH/IND3/60280/2021 dated 28.04.2021

प्रकल्प प्रायोजक

मे/र्स क्लासवन ॲग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि.

गट नं. 2148, पोस्ट-येळावी, तालुका-तासगाव,
जिल्हा-सांगली,महाराष्ट्र-416319

पर्यावरणीय सल्लागार

गौरांग एनव्हायनमेंटल सोल्यूशन्स प्रा. लि.

QCI/NABET मान्यताप्राप्त सल्लागार क्र.– NABET/EIA/2023/RA0192
एसएनजी श्री रत्न अपार्टमेंटस, तांबी पेट्रोल पंपा शेजारी,
बानी पार्क, जयपूर, राजस्थान-302016
ईमेलः**gaurangenviro@gmail.com**

मे, 2021

कार्यकारी सारांश

परिचय

मे/र्स क्लास-वन ॲग्रो बायोटेक आणि फर्टीलायझर्स प्रा. लि.(क्लासवन)ला 23 ऑक्टोबर 2013 रोजी कायदेशीरपणे स्थापित झाली आणि कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालया द्वारे जारी केलेल्या (MCA) अंतर्गत आरओसी द्वारे प्रमाणित करण्यात आली आहे. कंपनी अनेक प्रकारच्या सेंद्रिय दाणेदार खतांचा व्यापार करते आणि महाराष्ट्रात त्याचे विस्तृत जाळे आहे. क्लासवनचा विद्यमान प्लँट गट क्र. 2148, पोस्ट-येळावी, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र-416319 येथे आहे. या युनिट मध्ये जिप्सम दाणेदार खत व पावडर, मायक्रोन्युट्रीएंटस ग्रेड I, एनपीके दाणेदार खत आणि एसएसपी दाणेदार खत व पावडर यांचे उत्पादन घेतले जाते, याची एकूण क्षमता 250 MTPA आहे. विद्यमान जमीन 1.67 हेक्टर इतकी पसरलेली आहे आणि जमिनीचा वापर औदयोगिक वापरासाठी करण्यासाठी लागणारे बदल करण्यात आले आहेत. युनिट चालवण्यासाठी एमपीसीबीने वैध संमती दिलेली आहे, संमती क्र. MPCB/RO/KOP/SROS/KP-17762-20/613/3007/22 ही 31/10/2022 पर्यंत वैध आहे. विविध प्रकारच्या दाणेदार खताचे उत्पादन हे युनिट घेत आहे, त्यामुळे EIA अधिसूचना, 2006 नुसार व संबंधित सुधारणांनुसार, विद्यमान प्लँटसाठी पर्यावरणीय मंजुरी लागू होत नाही.

सध्याच्या बाजारपेठेतील विविध प्रकारच्या खतांची मागणी आणि कृषी उद्योगातील ताज्या परिस्थितीनुसार, क्लासवनने सध्याच्या युनिट मध्ये एसएसपी खतासाठी 300 MTPD आणि जीएसएसपी खता साठी 200 MTPD उत्पादन घेण्यासाठी विस्ताराचा व आधुनिकीकरणाचा प्रस्ताव ठेवला आहे. प्रस्तावित विस्ताराच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी विद्यमान प्लँटमध्ये आधीच्या ऑनसाइट व ऑफसाइट सुविधांमध्ये योग्य प्रकारे विस्तार केला जाईल/सुधारणा केल्या जातील. EIA अधिसूचना 2006 व त्यानंतरच्या दुरूस्तीनुसार, प्रस्तावित विस्तारीत प्रकल्प उपक्रम 5 (अ) अंतर्गत म्हणजेच, रासायनिक खतांमध्ये येतो आणि श्रेणी ब अंतर्गत पर्यावरणीय मंजुरी आधी घेणे आवश्यक आहे. प्रकल्प साइट अधिसूचित औदयोगिक क्षेत्राच्या बाहेर असल्यामुळे, सार्वजनिक सुनावणी/सार्वजनिक सल्ला या प्रकल्पासाठी लागू आहे. 27.01.2021 रोजी SEIAA/SEAC, महाराष्ट्र येथे TOR च्या मंजुरीसाठी अर्ज पाठवण्यात आला होता आणि तारीख 28.04.2021 रोजीच्या SIA/MH/IND3/60280/2021 पत्रानुसार संदर्भ अटी प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आल्या होत्या. प्रकल्पाचा तपशील खाली दिलेला आहेः

स. नं.	विशिष्ट	युनिट	प्रस्तावित

पर्यावरणीय परिणामाच्या मूल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश

मेसर्स क्लासवन ॲग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि. कडून केल्या जाणाऱ्या एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाच्या ब्राऊनफील्ड प्रकल्पासाठी

स. नं.	विशिष्ट		युनिट	प्रस्तावित
1.	प्रकल्प स्थिती(नवीन/विस्तारीत/सुधारीत)		-	ब्राऊनफिल्ड प्रकल्प
2.	उत्पादित केली जाणारी उत्पादने व क्षमता	SSP	MTPD	300
		GSSP	MTPD	200
3.	जमिनीचे एकूण क्षेत्र		हेक्टर	1.67
4.	ग्रीन बेल्ट क्षेत्र		हेक्टर	0.55
5.	ताज्या पाण्याची आवश्यकता		KLD	93 (स्त्रोतः कृष्णा नदीचे पृष्ठभागीय पाणी/टँकरचे पाणी)
6.	परिसरा बाहेर सांडपाणी सोडणे		KLD	0 (ZLD प्रकल्प)
7.	वीजपुरवठ्याची गरज		KVA	750 (स्त्रोतः MSEDCL)
8.	पॉवर बॅक अप		KVA	250 KVAचा 1 DG सेट
9.	मनुष्यबळाची गरज		क्र.	बांधकामाच्या स्थितीत 50 आणि चालवण्याच्या स्थितीत 200
10.	पर्यावरणीय नियंत्रण उपकरणासह प्रकल्प किंमत		रु. करोड	17.07

पर्यावरणाचे वर्णन

1 डिसेंबर 2020 ते 28 फेब्रुवारी 2021 या कालावधी साठी बेसलाइन पर्यावरणीय डेटा निर्मीती करण्यात आली आहे. प्रस्तावित प्लँटच्या आसपासच्या परिघातील 10-किमीचे अभ्यास क्षेत्र हे EIA अभ्यास क्षेत्राचे प्रभाव क्षेत्र समजले जाते.

1. ***<u>साइटची वैशिष्ट्ये</u>***

हे युनिट गट क्र. 2148, पोस्ट-येळावी, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र-416319 येथे स्थापित आहे. तासगाव तालुका एचक्यूच्या उत्तरपूर्व दिशेला 6.2 किमी. वर ही साइट आहे आणि राज्य महामार्ग -75 शी 1.42 किमी. वर उत्तरपूर्व दिशेला ती जोडलेली आहे आणि राज्य महामार्ग-136 ला कुंडल-सांगली रस्त्याने दक्षिणेकडे जोडलेली आहे. प्रकल्प साइट पासून जवळचे रेल्वेस्टेशन भिलवडी रेल्वे स्टेशन दक्षिणपश्चिमेकडे, 4.5 किमि. वर आहे आणि जवळचा विमानतळ 50 किमी. वर दक्षिणपश्चिमेकडे कोल्हापूर विमानतळ आहे.

प्लँट साइटच्या 10किमी. च्या परिघात नॅशनल पार्क, अभयारण्ये, हत्ती/व्याघ्र प्रकल्प, वन्य जीवांचे स्थलांतर मार्ग, दलदलीच्या जागा यासारख्या पर्यावरणीय संवेदनशील घटक नाहीत. तथापि, प्रकल्प साइटच्या पूर्वेकडे येरळा नदी 2.7 किमी. वरून, कृष्णा नदी 7.5 किमीवरून दक्षिणपश्चिमेकडे वहात आहेत आणि सागरेश्वर अभयारण्य प्रकल्प साइटच्या 15.81 किमी. वर उत्तरपश्चिमेला आहे.

2. टोपोग्राफी

साइटची टोपोग्राफी जवळपास सपाट आहे आणि साइटची उंची समुद्रसपाटीपासून 584 ते 585मीटर (amsl)च्या मध्ये आहे. प्रस्तावित साइटची 10 किमी च्या क्षेत्राची टोपोग्राफी किंचित खालीवर आहे. साइटच्या सभोवतालच्या परिसराची उंची 540-635 मीटर एएमएसएलच्या मध्ये आहे.

3. हवामान आणि हवामानशास्त्र (IMD)

तापमान- डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी थंडीचे महिने आहेत, या महिन्यात दररोजचे किमान तापमान जवळपास 14.4 से. असते आणि दररोजचे कमाल तापमान जवळपास 34.1 से. असते. एप्रिल आणि मे महिने सर्वात गरम महिने असतात, या महिन्यात दररोजचे कमाल तापमान जवळपास 37.3 से आणि दररोजचे किमान तापपमान जवळपास 22.2 से. असते.

सापेक्ष आर्द्रता- या क्षेत्रातील हवा साधारणपणे दमट असते. आर्द्रता पातळी 30-88 %च्या मध्ये आहे. पावसाळी हंगामात कमाल आर्द्रता 88 % असते.

पाऊस-एकूण वार्षिक पाऊस 681.8 मिमी. इतका आहे. जुलै ते सप्टेंबर दरम्यान वार्षिक पावसाच्या 77 % पेक्षा जास्त पाऊस पडतो.

हवेचा वेग- हवेचा वेग जास्त करून 1.2 ते 5.3 किमी/तास सर्व महिन्यात असतो. उन्हाळ्यात वाऱ्याचा वेग बहुतेक 2.8-5.3 किमी/तास असतो, तर पावसाळ्यात तो 4.4 ते 5.0 किमी/तास असतो आणि हिवाळ्यात वाऱ्याचा वेग 2.2 ते 2.4 किमी/तास इतका असतो.

हवेची दिशा- हिवाळ्यात हवेची मुख्य दिशा पूर्व असते. राहिलेल्या हंगामात वारा पश्चिमेकडून वहात असतो.

4. भूकंपशीलता

भारतीय मानक ब्युरोच्या विद्यमाने(बीआयएस कोडः)तज्ञ समितीने तयार केलेल्या भारतीय नकाशाच्या भूकंपीय विभागानुसार, टेक्टॉनिक वैशिष्ट्ये आणि भूतकाळातील भूकंपाच्या रेकॉर्डच्या आधारे. कोडः IS: 1893: भाग I 2002 , हे प्रकल्प क्षेत्र भूकंपाच्या झोन IV मध्ये येते. अशाप्रकारे, ते माफक ते नुकसानदायी भूकंप क्षेत्रात येते.

5. जमीनवापर

रिमोट सेन्सिंग डेटा वापरून जमीन वापराचे विश्लेषण केले होते. पध्दतशीर डिजीटल इमेजिंग वर आधारीत अर्थ लावण्याचा वापर जमीन वापराच्या प्रतवारी वर्णन करण्यासाठी केला आहे. असे आढळून आले होते की अभ्यास क्षेत्रामधील जमिनीच्या 80.45 %जमीन ही शेतजमीन आहे आणि 4.18 % वसाहतीसाठी वापरण्यात आली आहे. बाकीची 0.85%, 0.25%, 3.55%, 3.25%, 5.68% आणि1.80% जमिन ही अनुक्रमे औद्योगिक

क्षेत्र, पाण्याचे साठे, झुडपे नसलेली जमीन, नदी, झाडेझुडपे आणि भाजीपाल्यासाठी मोकळी जागा आहे.

6. ***<u>माती</u>***

अभ्यास क्षेत्रातील सहा ठिकाणचे मातीच्या नमुने घेण्यात आले आहेत. पोतानुसार, अभ्यास क्षेत्रातील माती वालुकामय चिकणमाती आणि चिकणमाती आहे असे आढळून आले आहे. 1.121 ते 1.298 ग्रॅ/सेमी3 च्या श्रेणीमध्ये मातीची घनता मोठ्या प्रमाणात आढळून आली होती. अभ्यास क्षेत्रातील मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता 25 ते 38 %इतकी आढळून आली होती. पृष्ठभागीय मातीतील उपलब्ध नायट्रोजन घटक 155 ते 378 किग्रॅ/हेक्टर च्या दरम्यान आहे, त्यामुळे असे दिसून येते की मातीमध्ये नायट्रोजन घटक कमी ते मध्यम प्रमाणात आहे. मातीमध्ये फॉस्फरसची उपलब्धता 30.8व 68.8 किग्रॅ/हेक्टर दरम्यान आहे, त्यामुळे असे दिसून येते की मातीत फॉस्फरसचा घटक उच्च प्रमाणात उपलब्ध आहे. या मातीतील पोटॅशियमचा घटक 132 ते 197 किग्रॅ/हेक्टर दरम्यान आहे, त्यामुळे असे दिसून येते की मातीतील पोटॅशियमचा घटक मध्यम प्रमाणात आहे. एकंदरीत, अभ्यास क्षेत्रातील माती माफक प्रमाणात सुपीक आहे.

7. ***<u>पाणी</u>***

आठ भूजल नमुने आणि दोन पृष्ठभागीय पाण्याचे नमुने अभ्यास कालावधीत साइटच्या वेगवेगळ्या ठिकाणाहून(प्रकल्प साइटच्या जवळील भूजल, येळावी गाव, नेहरू नगर, तुर्ची गाव, जेळुवाडी गाव, नागाव निमानी, तावदरवाडी गाव आणि बांबवडे गाव आणि दक्षिणपश्चिमेला- भिलवडी जवळची कृष्णा नदी आणि आमनापूर जवळची कृष्णा नदी) गोळा करण्यात आले होते. पाण्याचे नमुने भौतिक रासायनिक मापदंड आणि बॅक्टेरियॉलॉजिकल मापदंडा साठी तपासण्यात आले होते. एकंदरीत, भूजल नमुन्याचे मापदंड भारतीय मानक आयएस च्या परवानगी असलेल्या मर्यादेच्या आत आहेतः सर्व ठिकाणी IS: 10500-2012. भूजल नमुन्यांमध्ये कोणतेही जड धातूविषयक आणि जीवाणुविषयक प्रदूषण आढळून आले नाही. जीवाणूविषयक आणि जड धातूविषयक प्रदूषण पृष्ठभागीय पाण्याच्या नमुन्यांमध्ये आढळून आले होते. तथापि, पृष्ठभागीय पाणी सीपीसीबीच्या सी निकषाचे सर्वोत्तम नियुक्त वापर करत असल्याचे आढळून आले आहे(म्हणजेच पारंपारिक उपचार आणि निर्जंतुकीकरणानंतर पेयजलाचा स्त्रोत).

8. ***<u>हवेची गुणवत्ता</u>***

प्रबळ वाऱ्याची दिशा, लोकसंख्येचे क्षेत्र आणि संवेदनशील रिसेप्टर्स यांचा विचार करून अभ्यास क्षेत्रामध्ये आठ ठिकाणी एएक्यू मॉनिटरिंग केले गेले. MoEF जीओएल अधिसूचना तारीख 16.11.2009, द्वारे निर्देशित केलेल्या राष्ट्रीय सभोवताल हवा गुणवत्ता मानकांशी तुलना करून सभोवताल हवा गुणवत्तेच्या निष्कर्षावर देखरेख केली होती.. PM_{10}, $PM_{2.5}$, SO_2, NOX, CO आणि NH_3 ची जास्तीत जास्त एकत्रीकरण होते अनुक्रमे 96 µg/m3, 49 µg/m3, 9.7 µg/m3, 20.6 µg/m3, 0.82 µg/m3आणि 27.7 mg/m3.

9. ***<u>ध्वनी</u>***

वाहने आणि काही औद्योगिक कामांशिवाय तेथे कोणताही मुख्य आवाजाचा स्त्रोत नाही. आणि प्रकल्प साइटवर सर्व प्रक्रिया उपकरणे एका बंदिस्त शेड मध्ये स्थापन केलेली आहेत. ध्वनि पातळी दिवसाच्या वेळी 48.6 dB(A) ते 62.2 dB(A) आणि रात्रीच्या वेळी 40.4 dB(A) ते 54.2 dB(A) इतकी आहे. सर्व देखरेख स्टेशन मधील आवाजाची पातळी सुचवण्यात आलेल्या मर्यादेच्या आत असल्याचे आढळून आले आहे. अभ्यास क्षेत्रातील सभोवताल आवाजाची पातळी ही सुचवण्यात आलेल्या राष्ट्रीय सभोवताल ध्वनि गुणवत्ता मानकाच्या आत असल्याचे आढळून आले आहे, संबंधित निवासी क्षेत्रातील (दिवसाच्या वेळी 55 Leq dB(A) आणि रात्रीच्या वेळी 45 Leq dB(A) मानक), व्यावसायिक क्षेत्र(दिवसाच्या वेळी 65 Leq dB (A)आणि रात्रीच्या वेळी 55 Leq dB(A) मानके) आणि औद्योगिक क्षेत्र(दिवसाच्या वेळी 75 LeqdB(A) आणि रात्रीच्या वेळी 70 Leq dB(A) मानके).

10. ***<u>जैविक पर्यावरण</u>***

आधारभूत अभ्यासाच्या वेळी आधीच्या पर्यावरणीय वातावरणासाठी आधारभूत अभ्यास करण्यात आला होता. शेताच्या नमुन्यांच्या प्रयत्नांमध्ये प्रस्तावित प्रकल्प साइट आणि प्रस्तावित साइटच्या भोवतालचा 10 किमी परिसर समाविष्ट आहे. प्रस्तावित साइटच्या 10 किमी क्षेत्रातील बहुतेक जमीन ही शेती खाली आहे.

<u>फ्लोरा:</u> प्रकल्प साइटच्या भोवतालचा 2 किमी क्षेत्र हे कोअर झोन मानले गेले आहे. कोअर झोन मध्ये आढळणाऱ्या सामान्य झाडांचे प्रकार आहेत बाभूळ, पिंपळ, एफ. बेंगलेन्सिस, कॅशिया फिश्चुला, बेलफळ, चिंच, अल्बेझिया लेब्बेक, आणि डाल्बेर्जिया लॅटिजोलिया. वनौषधी आणि झुडुपे प्रजाती झॅन्थियम स्ड्रुमेरियम, नेरियम इंडिकम, पार्थेनियम एसपीपी. कॅलोट्रोपिस प्रोसेरा, लँटाना कॅमारा, विटेक्स न्युगुंडो, झिजिफस मॉरिशियाना, कॅनाबिस सॅटिवा, आणि काही गवताच्या प्रजाती. सूचीबध्द तसेच निरीक्षण केल्या गेलेल्या झाडांच्या प्रजातींचे भारतीय झाडांचे रेड डेटा बुक (बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया) मध्ये तपासणी केलेली आहे. अभ्यास क्षेत्राच्या कोअर झोन आणि बफर इम्पॅक्ट झोनमध्ये कोणतीही नामशेष, लुप्तप्राय, असुरक्षित, दुर्मिळ आणि / किंवा गंभीर फुलांच्या प्रजाती आढळल्या नाहीत.

<u>प्राणीजात:</u> प्रस्तावित साइटच्या आसपासचे 10 किमी क्षेत्र हे ग्रामीण आणि शहरी वसाहतींचे मिश्रण आहे. सध्या येथे कोणतेही जंगल अस्तित्वात नसल्यामुळे, या ठिकाणी कोणतेही वन्य प्राणी अस्तित्वात नाहीत. सस्तन प्राणी, इतर विशिष्ट प्रदेशातील किंवा कालखंडातील प्राणिजात मुंगूस प्राणी, सरपटणारे प्राणी क्वचित पहायला मिळू शकतात. तथापि, परिसरात पाण्याचे साठे चांगल्या प्रमाणात असल्यामुळे येथे प्राण्यांमध्ये विविधता आहे. सूचीबध्द केलेल्या प्राण्यांच्या प्रजातींचे भारतीय प्राण्यांचे रेड डेटा बुक (झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया) मध्ये तपासणी केलेली आहे. अभ्यास क्षेत्रात कोणतेही लुप्तप्राय किंवा शेड्यूल-1 प्राणी प्रजाती अस्तित्वात नाहीत.

11. ***<u>लोकसंख्याशास्त्र:</u>***

पर्यावरणीय परिणामाच्या मूल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश

मेसर्स क्लासवन अॅग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि. कडून केल्या जाणाऱ्या एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाच्या ब्राऊनफील्ड प्रकल्पासाठी

अभ्यास क्षेत्रामध्ये 32 गावे आणि शहरे येतात. आगामी प्रकल्पाचा परिणाम मोजण्यासाठी साइटच्या जवळ असलेल्या आणि लवकर पोहोचू शकणाऱ्या येळावी या गावात, सल्लामसलत आणि सामा.-आर्थिक सर्वेक्षण मुख्यतः करण्यात आले होते. भारतातील 2011च्या जनगणनेनुसार, अभ्यास क्षेत्रातील एकूण लोकसंख्या 151964 आहे त्यात पुरूषांची संख्या 78373 (51.57%) आणि महिलांची संख्या 73589 (48.43 %) इतकी आहे. अभ्यास क्षेत्रातील सरासरी लिंग गुणोत्तर 939 आहे, त्यातून दिसून येते की महिला व पुरूषांचे समान प्रमाण तेथे आहे. लोकसंख्येपैकी 10.21 % 0-6 वयोगटाचे आहेत. अभ्यास क्षेत्रातील 0-6 वयोगटाचा सरासरी लिंग गुणोत्तरामध्ये प्रती 1000 मुलांमध्ये 859 मुली आहेत. ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक शेती करणारे आणि शेतात काम करणारे मजूर आहेत त्यातून प्रबळ शेतीव्यवस्था दिसून येते. या ठिकाणी घेतली जाणारी प्रमुख पिके आहेत द्राक्षे, सुदान गवत, ऊस, हळद, नारळ इ. लोकांचा एक छोटा गट घरगुती उद्योगात कामगार म्हणून काम करत आहे.

अपेक्षित पर्यावरणीय परिणाम आणि शामक उपाय

1. ***<u>वायु प्रदूषण</u>***

बांधकामाच्या स्थितीच्या दरम्यान, आधीचे युनिट असल्यामुळे, प्रकल्पात केले जाणारे बांधकाम मर्यादित आहे. यंत्रसामुग्री बसवत असताना सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेवर परिणाम करणारा घटक धुळ असणार आहे. त्यात कच्चा माल आणि यंत्रसामुग्रीची वाहतूक करण्यासाठी ट्रक सारख्या वाहनांच्या हालचालीने होणारी धुळ भर घालणार आहे. त्यामुळे, पीएमची निर्मिती आणि वाहनांमुळे होणारे इतर वायु निर्मिती बांधकामाच्या दरम्यान असणार आहे. आधीचे रस्ते वाहतुकीसाठी वापरण्यात येतील आणि सध्याचे रस्ते बऱ्यापैकी चांगल्या स्थितीत आहेत. साइटच्या सभोवताली शेतजमीन असल्यामुळे जवळच्या वस्तीला प्रस्तावित सुविधे मुळे काही प्रमुख परिणाम होईल असे अपेक्षित नाही. तथापि, बांधकामामुळे होणारे परिणाम कमी करण्यासाठी आवश्यक असणारे शक्य ते सर्व उपाय केले जातील.

युनिट चालू असतानाच्या स्थितीत, प्लँटमधील उत्सर्जनाचे मुख्य कारण आहे जीएसएसपी प्लँट मधील कोळशाचे ज्वलनामुळे स्टॅकमधून निर्माण होणारे पीएम व एसओटू आणि एसएसपी प्लँटमधील एचएफ व एसपीएफची निर्मिती. **एसएसपी/जीएसएसपी खतांच्या उत्पादनातील प्रमुख प्रदूषक घटक आहेत एसपीएम व फ्लुओराइड. तसेच, युनिट चालू असताना सामुग्री हाताळताना धुळ निर्माण होते.** सीपीसीबी नियमांनुसार स्टॅकची उंची योग्यप्रकारे स्थापित केली जाईल. एसएसपी प्रक्रिया प्लँटमधून निघणाऱ्या वायुचे व्हेंट कार्यक्षमतेने स्क्रब करण्यासाठी एक फोर-स्टेज फ्लुओराइड स्क्रबर पुरवला जाईल.

आणि जीएसएसपी प्लँट मधील उत्सर्जनासाठी-भट्टीमधील कोळशाचे ज्वलन, ग्राइंडिंग आणि दाणेदार करणे यामधून होणारे उत्सर्जन टाळण्यासाठी बॅग फिल्टर सह सायक्लोन सेपरेटर पुरवले

जाईल. सामुग्रीची हाताळणी आणि रॉक फॉस्फेटचे दळण कारखान्यातील बंदिस्त इमारती मध्ये केले जाईल. हाऊसकिपींगच्या चांगल्या सेवा तेथे दिल्या जातील. शिफारस केलेल्या मापदंडासाठी लागू असल्याप्रमाणे सभोवतालच्या हवेचे नियमितपणे परीक्षण केले जाईल. वाहतुकीतून /जागेतून निर्माण होणाऱ्या हवेतील धुळीवर पाणी फवारून किंवा आच्छादन पुरवून नियंत्रण आणले जाईल. सर्व प्रकारच्या धुळ निर्माण करणाऱ्या ठिकाणी कार्यक्षम वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा (धुळ संकलित करणाऱ्या बॅग) पुरवण्यात येतील. पाण्याची फवारणी/कोरडे धुके निर्माण करणाऱी यंत्रणा क्षणिक धुळ खाली बसवण्यासाठी वापरली जाईल.

*2. **<u>ध्वनि प्रदूषण</u>***

बांधकाम चालू असण्याच्या स्थितीत, प्रकल्पामध्ये मर्यादित बांधकामे केली जात असल्यामुळे, यंत्रसामुग्री बसवण्यामुळे निर्माण होणारा आवाज हा खूप कमी कालावधी साठी असणे अपेक्षित आहे. आधीच्या युनिट मधील ध्वनि पातळी ही औद्योगिक झोन मधील परवानगी असलेल्या मर्यादेच्या आत आहे. प्रकल्प साइटच्या सीमेच्या आत उत्पन्न होणारा ध्वनि टाळण्यासाठी बांधकामाची कामे सुरू होण्यापूर्वी संपूर्ण परिघात वृक्षारोपन केले जाणार आहे. त्यामुळे, विस्तारीकरणाच्या स्थितीत प्रकल्प साइट वरून निर्माण होणाऱ्या ध्वनिचा परिणाम हा क्षुल्लक, उलट करता येणारा आणि नैसर्गिकपणे स्थानिक असणार आहे आणि तो फक्त दिवसाच केला जाणार आहे. हा परिणाम अगदी थोड्या कालावधी साठी असणार आहे. प्रतिबंधक उपाय म्हणून मजूरांना वैयक्तिक संरक्षक उपकरणे दिली जातील.

युनिट चालू असतानाच्या स्थितीत, प्रस्तावित प्रकल्पामध्ये ध्वनि निर्माण होण्याचे मुख्य स्त्रोत आहेत, विविध प्रकारचे आयडी पंखे, बॉयलर, पंप आणि कॉम्प्रेसर,ग्राइंडर, डीजी सेट, इ. आधारभूत अभ्यासानुसार, प्लँट मधील ध्वनि पातळी ही मानक मर्यादेच्या आत आहे , पण ती साइट क्षेत्रात आणि आजूबाजूला प्लँटमधील विविध यंत्रांच्या चालू होण्याच्या आवाजामुळे वाढली जाणार आहे. प्रकल्प साइटच्या जवळ कोणतीही वस्ती नाही. प्रकल्पातील कामांमुळे निर्माण होणारा आवाजामुळे वातावरणीय आवाजात लक्षणीय वाढ होणार नाही. तसेच, चालवण्याच्या मानक प्रकारांचा वापर करून, इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल युनिटचे प्रतिबंधक व्यवस्थआपन, मोटर व रोटेटिंग शाफ्ट, गिअर बॉक्स,कन्व्हेयर यंत्रणा इ. अशा प्रकारचे परिणाम कमी केले जाऊ शकतात आणि अलक्षणीय बनवले जातात. इंजिनियरिंगच्या सर्व नियंत्रित सेवा यंत्रसामुग्री बसवत असताना हाती घेतल्या जातील व ध्वनि पातळी कायम राखली जाईल. आवश्यक असणाऱ्या सर्व ठिकाणी ध्वनिविषयक संलग्नक व मफलर पुरवण्यात येतील. जड यंत्रे स्थापित केलेल्या सर्व ठिकाणी व्हायब्रेशन पॅड आणि फाऊंडेशन पुरवण्यात येईल. उच्च ध्वनि असलेल्या ठिकाणी काम करणाऱ्या सर्व कामगार इअरमफ वापरतील. संलग्नकासह डीजी सेट पुरवण्यात येतील.

*3. **<u>जल प्रदूषण</u>***

पर्यावरणीय परिणामाच्या मूल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश

मेसर्स क्लासवन अॅग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि. कडून केल्या जाणाऱ्या एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाच्या ब्राऊनफील्ड प्रकल्पासाठी

बांधकामाच्या स्थितीत, पेयजल, सांडपाणी व्यवस्था या आधीच्या सुविधांचा वापर स्थापनेच्या /बांधकामाच्या हेतूसाठी केला जाईल. अपेक्षेनुसार, मजुरांची संख्या खूप कमी आहे त्यामुळे अतिरिक्त मनुष्यबळासाठी जास्तीच्या सुविधांची गरज नाही.आधीचा पाणी पुरवठा वापरला जाईल आणि मजुरांच्या वाढीव गरजांसाठी तो(2KLD) पुरेसा आहे. शौचालयात निर्माण होणारे सांडपाणी आधीच्या प्रमाणेच निष्कासित केले जाईल, म्हणजेच, शोष खड्ड्यांद्वारे निष्कासन. बांधकामासाठी 2KLDपाणी लागणार आहे त्यासाठी टँकर पुरवठ्या द्वारे पाणी घेतले जाईल.साइटचा पृष्ठभाग हा समतल पातळीवर असल्यामुळे प्रकल्प क्षेत्राच्या आत वादळी पावसाच्या पाण्याच्या निष्कासन करण्यासाठी पुरेसा उतार बांधला जाईल, त्यामुळे पावसाचे पाणी प्रकल्प साइट मधील रेन वॉटर हार्वेस्टिंग मध्ये जमा होईल. रेडी मिक्स काँक्रिटसाठी कमीत कमी पाण्याची आवश्यकता असते, तसेच सिव्हील कामात रसायनांचा वापर केल्यामुळे साइटवरील पाण्याची गरज कमी होईल. त्याचप्रमाणे, अशा प्रकारच्या पध्दती वापरल्यामुळे बांधकामामुळे व्यावहारिकदृष्ट्या शून्य सांडपाणी निर्मिती होईल. त्यामुळे, कोणतेही सांडपाणी पृष्ठभागावर किंवा जमिनीवर निष्कासित केले जाणार नाही. त्यामुळे, बांधकामाच्या स्थितीत पाण्याच्या प्रांतात(आकारमान व गुणवत्ता) कोणताही परिणाम होणार नाही.

युनिट चालवण्याच्या स्थितीत,(आधीच्या युनिट चालवण्याच्या स्थितीसह) विस्तार केल्या नंतर एकूण पाण्याची आवश्यकता असणार आहे 93 KLD. एसएसपी प्लँट, जीएसएसपी प्लँट, घरगुती वापर, आणि ग्रीन बेल्ट यासाठी पाणी वापरले जाईल. सांगली पाटबंधारे विभागाकडून एक पंप बसवून (प्रकल्पाने आधीच परवानगी घेतलेली आहे) पाइपलाइन द्वारे किंवा टँकर पुरवठ्या द्वारे हे ताजे पाणी पुरवले जाईल.

पाण्याचा वापर कमी करण्यासाठी शक्य ते सर्व उपाय प्लँट मध्ये केले जातील. एसएसपी/जीएसएसपी प्रक्रियेतून औद्योगिक सांडपाणी निर्माण होत नाही. फक्त, त्या ठिकाणी स्क्रबिंग सांडपाणी तयार होते व ते प्रक्रियेत पुन्हा वापरले जाते. तथापि, त्याठिकाणी 9 KLD सांडपाणी निर्माण होते व त्यावर सेप्टिक टाक्यात उपचार केले जातील. प्रस्तावित प्रकल्प हा शून्य-द्रव निष्कासन प्रकल्प आहे.

पावसाच्या पाण्याचे प्रदूषण होणे टाळण्यासाठी, ते गोळा करण्यासाठी आणि औद्योगिक शेड, साठवण गृहे, आणि युटिलिटी व व्यवस्थापकीय इमारतीच्या छपरावर/गच्चीवर पडणारे पावसाचे पाणी वळवण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल. असे पावसाचे पाणी वादळी पावसाच्या निष्कासनाकडे वळवले जाईल.

कोरडी धुळ गोळा केली जाईल आणि बंदिस्त कंटेनर/जागी ठेवली जाईल आणि पाण्यात मिसळू दिली जाणार नाही. चांगले हाऊसकिपींग कायम राखले जाईल. एसएसपी प्रक्रिया प्लँट मधील गॅस व्हेंटला कार्यक्षमतेने स्क्रब करण्यासाठी एक फोर-स्टेज फ्ल्युओराइड स्क्रबर दिला जाईल. पाणी पंपाद्वारे स्क्रबर मध्ये आणले जाईल आणि नोझल द्वारे रिकाम्या टॉवर मध्ये फवारले जाईल. हा स्क्रबर लिकरचा द्रव प्रवाह

पर्यावरणीय परिणामाच्या मूल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश

मेसर्स क्लासवन ॲग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि. कडून केल्या जाणाऱ्या एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाच्या ब्राऊनफील्ड प्रकल्पासाठी

एसएसपी उत्पादनावर शिंपडला जाईल, आणि अशा प्रकारे झेडएलडी आधारे ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल. लोडिंग, अनलोडिंग करताना व साठवणूक करताना उडणारे शिंतोडे नाल्यांमधून योग्य प्रकारे वळवण्यात येतील. सांडपाणी पृष्ठभागावरून किंवा भूजलामध्ये निष्कासित केले जाणार नाही.

*4. **सांडपाणी व्यवस्था***

बांधकामाच्या स्थितीत, बांधकामाच्या स्थिती दरम्यान कोणताही प्रमुख घन कचरा निर्माण केला जात नाही. केवळ, बांधकामाची डबर, धातूचे टाकून दिलेले तुकडे आणि रिकामे कंटेनर इ. थोड्या प्रमाणात निर्माण होईल. याशिवाय, कामगारांकडून काही प्रमाणात नगरपालिका कचरा तयार होऊ शकतो आणि खणल्यामुळे मातीचा. हा कचरा गोळा करणे आवश्यक आहे, वेगळा केला पाहिजे आणि हवा, पाणी आणि मातीच्या पर्यावरणाचे प्रदूषण होणार नाही अशा प्रकारे त्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

युनिट चालवण्याच्या स्थितीत, उत्पादन प्रक्रिया आणि इतर कामांमुळे विविध प्रकारचे औद्योगिक धोकादायक कचरा निर्माण होईल. कचरा ड्रम मध्ये/एचडीपीई बॅग मध्ये ठेवला पाहिजे आणि नियुक्त जागी साठवून ठेवला पाहिजे. खराब ल्यूब तेल, काढून टाकण्यात आलेले कंटेनर अशा प्रकारचा धोकादायक औद्योगिक कचरा पुनर्वापरकर्त्यांना विकला जाईल. सर्व कचऱ्याची विल्हेवाट घातक व इतर कचरा (व्यवस्थापन आणि आंतरगामी चळवळ) दुरूस्ती नियम, 2021 नुसार लावण्यात येईल. *H_2SiF_6 (8-10% Conc.) आणि फिल्टरेटचा प्लँट मध्ये पुन्हा वापर केला जाईल.* घन कचरा व्यवस्थापन नियम, 2016 चे पालन केले जाईल. नियुक्त जागी फ्लाय ॲश गोळा केली जाईल. तिची विक्री कॉन्ट्रॅक्टर सिमेंट/ वीट उत्पादकांना विकू शकतात.

त्याचप्रमाणे, तेथे 60 किग्रॅ नगरपालका घन कचऱ्याची सुध्दा निर्मिती होईल. गळती होऊ नये याची पूर्ण खबरदारी घेतली जाईल. अशा प्रकारे, साइटवर स्वच्छता राखण्यासाठी कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. बायोडिग्रेडेबल कचऱ्याची विल्हेवाट गांडूळखत-कम्पोस्ट द्वारे लावली जाईल आणि बायोडिग्रेडबल नसलेला कचरा (रिकामी कंटेनर, वापरलेले तेल व ल्युब्रिकंट, इ.) योग्य पुनर्वापरकर्त्याला विकले जाईल.

*5. **जमीन व माती पर्यावरण***

जमीनीचा ताबा क्लासवन कडे आहे. एकूण जमीन क्षेत्र 1.67 हेक्टर आहे. प्रस्तावित विस्तारीकरण आधीच्या प्लॉटच्या सीमेच्या आतच केले जाईल. 0.55 हेक्ट. म्हणजे, जवळपास एकूण प्लॉट क्षेत्राच्या 33 % जमिन प्रकल्पाच्या आवारात ग्रीन क्षेत्र म्हणून विकसित केली जाईल.

बांधकामाच्या स्थितीत, जमिनीचा वापर केला जाणार नाही/जमिनीवर आच्छादन केले जाणार नाही कारण आधीच्या प्रकल्पाचे हे विस्तारीकरण आहे. प्रस्तावित विस्तारीकरण आधीच्या प्रकल्पाच्या साइटच्या आतच केले जाणार आहे आणि सध्या आधीच्या साइटच्या जमिनीचा वापर उद्योगासाठी केला जात आहे.

अविकसित किंवा शेतजमीन वापरण्यात येणार नाही. कामासाठी मंजुरीची आवश्यकता असणार नाही. प्रकल्पात कोणतेही मोठे खोदकाम केले जाणार नाही , कामाशी संबंधित अगदी थोडे खोदकाम केले जाईल. बांधकाम स्थिती दरम्यान जड यंत्रसामुग्री चालवण्याची गरज असू शकते त्यामुळे माती घट्ट होऊ शकते. स्थापनेशी संबंधित प्रकल्पातील उपक्रम 12 महिने इतक्या कमी काळापुरतेच मर्यादित असतील. डबर आणि सुट्टा कच्चा माल संरक्षित पृष्ठभागावर झाकलेल्या स्थितीत ठेवला जाईल. घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 आणि बांधकाम व खंडन (सी व डी) कचरा व्यवस्थापन नियम, 2016 चे पालन केले जाईल.

युनिट चालवण्याच्या स्थितीत, असा कचरा निर्माण होईल जो प्रकल्प साइटच्या सभोवतालच्या शेतजमिनीला प्रदूषित करू शकेल. सांडपाणी, रसायन(ॲसिड), घातक कचरा, वापरलेले तेल आणि इंधन सारख्या सामुग्रीचे शिंतोडे माती प्रदूषित करू शकतात. त्यामुळे, गळती थांबवण्यासाठी ॲसिड, इंधन टाक्यांना दुय्यम साठवण दिली जाते आणि गळती नियंत्रित करण्यासाठी जास्त खबरदारी घेतली जाते. गळती शोधण्यासाठी सेन्सर पुरवले जातील.

कोणत्याही दुरूस्ती आणि देखभालीच्या कामानंतर कोणतीही जागा उघडी ठेवली जाणार नाही किंवा खुली ठेवली जाणार नाही. शिंतोडे किंवा गळती गोळा करण्यासाठी नाले यंत्रांच्या जवळपास असतील. साठवण करताना उडणाऱ्या शिंतोड्यांमुळे होणारे मातीचे प्रदूषण टाळण्यासाठी खबरदारी घेतली जाईल. मातीचे प्रदूषण टाळण्यासाठी प्रक्रिया क्षेत्राच्या जवळ फरसबंदी लावली जाईल. लोडिंग अनलोडिंग कामे सुरक्षित परिभाषित झोन मध्ये आणि चिन्हांकित सुरक्षित ठिकाणी केली जातील.

*6. **<u>पर्यावरणीय विज्ञान आणि जैवविविधता</u>***

बांधकामाच्या स्थितीत, प्रस्तावित विस्तारी करणासाठी एकही झाड तोडण्याची गरज पडलेली नाही त्यामुळे स्थलीय पर्यावरणावर होणारा थेट परिणाम(झाडे आणि प्राणीप्रजाती नाश) हा लक्षणीय नाही. **साइट मानव निर्मित व नैसर्गिक जंगल रहित असल्यामुळे, स्थलीय पर्यावरणावरील एकूण परिणाम शून्य असेल.**

युनिट चालवण्याच्या स्थितीत, सभोवतालच्या पर्यावरणावरील परिणाम हा मुख्यतः वायू प्रदूषकांच्या साठवणुकीमुळे असू शकतो. **वायू प्रदूषकांच्या वाढत्या उत्सर्जनामुळे पर्यावरणामध्ये काही महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता नाही, कारण प्रस्तावित प्रकल्पाच्या कामकाजादरम्यान सभोवतालची हवेची गुणवत्ता राष्ट्रीय वातावरणीय हवाच्या गुणवत्तेच्या मानकांनुसार राहील. प्रदूषक(पीएम) थोड्या प्रमाणात जमा होण्याने सुध्दा सभोवतालच्या शेतीवर व पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो. हवेच्या उत्सर्जनाचे निकष मिळविण्याकरिता बहुतेक कार्यक्षम वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणेद्वारे हा प्रकल्प आखण्यात आला आहे, जेणेकरून जवळपासच्या परिसंस्थेवरील परिणाम कमी होईल.**

प्रकल्पाच्या 10 किमी क्षेत्राच्या आत कोणतेही राष्ट्रीय उद्यान, वन्यजीव अभयारण्य, जैवविविधता

अस्तित्वात नाही. प्रकल्प साइटच्या १० कि.मी. क्षेत्रामध्ये कोणतीही धोकादायक किंवा दुर्मिळ किंवा धोकादायक वनस्पती किंवा प्राणी प्रजाती आढळून आली नाहीत म्हणून आरईटी प्रजातींवर होणारा परिणाम नगण्य आहे.

7. __सामा-आर्थिक पर्यावरण__

प्रस्तावित जमिन क्लासवनच्या ताब्यात आहे आणि साइटसाठी आर व आर लागू नाही. प्रकल्प विकासामध्ये साहित्य आणि बांधकाम इ. कामांचा समावेश आहे.

बांधकामाच्या स्थितीत, कुशल आणि अकुशल कामगारांसाठी बांधकामामुळे रोजगार निर्माण केला जाईल. अकुशल आणि उप-कुशल कामगारांपैकी बरेच कामगार जवळपासच्या गावातून घेतले जातील. त्यामुळे, प्रकल्पाच्या बांधकामाचा सामाजिक पर्यावरणावर सकारात्मक परिणाम असणार आहे. स्थानिक मजूरांसाठी प्लँट मधील अपघात आणि ध्वनि समस्या या मुख्य चिंता आहेत. त्यामुळे, या परिणामांवर मात करण्यासाठी काही उपाय करण्याची गरज आहे. गोंगाट असणाऱ्या व जोखमीच्या ठिकाणी काम करणाऱ्या सर्व मजूरांना पीपीई दिली जाईल. तसेच, बांधकामाच्या स्थिती दरम्यान अपघात टाळण्यासाठी, अंतर्गत रूंद रस्ते, ट्रकचे योग्य ठिकाणी पार्किंग- लोकांच्या हालचालीत व्यत्यय येणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाईल. त्याचप्रमाणे, बांधकामाला लागणारी सर्व यंत्रे सुरक्षित आणि प्रमाणित उपकरणे, बेल्ट, क्रेन इ. असतील याची खात्री केली जाईल. कामगार भरपाई कायद्यात असणाऱ्या, आणि मार्गदर्शक तत्वांशी संबंधित असणाऱ्या कारखाना कायद्याने सुचवण्यात आलेल्या नियमांचे पालन कंत्राटदार करतील.

युनिट चालवण्याच्या स्थितीत, त्याठिकाणी जास्तीत जास्त 200 मजूरांची आवश्यकता असेल, कच्चा माल, आणि उत्पादनाच्या वाहतुकी सारख्या विविध कामातून अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी त्यातून निर्माण होतील. प्लँट मधील गंभीर प्रकारच्या नसलेल्या कामांसाठी(कँटीन, बागकाम, हाऊसकीपिंग इ.)कंत्राटी मनुष्यबळ लागणार आहे. प्रदेशाच्या औद्योगिक विकासामुळे या भागातील पायाभूत सुविधांच्या विकासास मदत होईल. सामाजिक-आर्थिक परिणामांचा अंतर्गत, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यावर होणाऱ्या परिणामांशी संबंध आहे. हे परिणाम समाजाच्या जीवनाच्या गुणवत्तेच्या मापदंडातील सकारात्मक बदलाशी संबंधित आहेत.

प्रस्तावित प्रकल्पामुळे / एसएसपी / जीएसएसपीचे उत्पादन वाढेल जे शेतकऱ्यांना विकले जाईल. यामुळे करांच्या माध्यमातून सरकारला उत्पन्नही मिळणार आहे. एकंदरीत, या प्रकल्पाचा सामाजिक-आर्थिक पर्यावरणावरील सकारात्मक परिणाम असणार आहे. आसपासच्या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीच्या उत्पादन प्रकारात खताच्या वापरामुळे बदल होऊन शेतमालाच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

तथापि, युनिट चालवणे आणि देखरेख करणे यामुळे कर्मचारी आणि जवळ राहणाऱ्या इतर लोकांसाठी अनेक

पर्यावरणीय परिणामाच्या मूल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश

मेसर्स क्लासवन ॲग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि. कडून केल्या जाणाऱ्या एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाच्या ब्राऊनफील्ड प्रकल्पासाठी

प्रकारच्या जोखमी असू शकतात. कर्मचाऱ्यांवर आणि जवळपासच्या क्षेत्रावरील परिणाम कमी करण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना केल्या जातील.

निष्कर्ष

वरील विश्लेषणावरून असे आढळले आहे की अपेक्षित परिणाम मध्यम ते कमी महत्त्व आणि विशालतेत बदलतात. प्रस्तावित विस्तारापासून पूर्वनियंत्रण आणि आकुंचन अवस्थेत कोणताही मोठा परिणाम होण्याची शक्यता नसते आणि त्या प्रभावावर मात करण्यासाठी सर्व मूलभूत सुविधा साइटवर नियोजित आहेत. तथापि, युनिट चालवण्याच्या टप्प्यात, प्रदूषित हवेची गुणवत्ता वाढल्याने आणि आवाजाची पातळी वाढल्याने परिणाम अपेक्षित आहे. या प्रकल्पात अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती, स्वदेशी उत्पादनात वाढ, जीओआयच्या अनुदानाचा भार कमी करणे, आणि शेतकऱ्यांना रासायनिक खते उपलब्ध करून देणे यासारखे अनेक सकारात्मक परिणामही या प्रकल्पाचे आहेत. असे मानले जाते की प्रस्तावित शामक उपाय करून अपेक्षित नकारात्मक परिणाम सुध्दा सामान्य केले जाऊ शकतात.

पर्यावरण मॉनिटरींग प्रोग्राम

आवश्यक अनुपालनांचे पालन करण्यासाठी नियामक आवश्यकतानुसार पर्यावरणीय देखरेख योजना लागू केली जाईल. एमओईएफ आणि सीसी मार्गदर्शक तत्वानुसार, पर्यावरण संनियंत्रण अहवाल आणि पर्यावरण मंजूरीमध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन, आरओ-एमओईएफ आणि सीसी, एसपीसीबी, एमओईएफ आणि सीसी ऑनलाइन पोर्टल म्हणजे, परिवेश यांना सादर केले जाईल आणि ते कंपनीच्या वेबसाइटवर अपलोड केले जातील.

अतिरिक्त अभ्यास

जोखीम मूल्यांकन अभ्यास धोका ओळखण्यासाठी आणि जोखीम निर्माण करणाऱ्या योजना कमी करण्यासाठी हाती घेण्यात आला आहे. मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व उपायांचा अवलंब केला जाईल. साइटवर आणि ऑफ-साइट आपत्कालीन योजना प्लँट मध्ये असतील आणि व्यवस्थापनाची कडक देखरेख असेल आणि ऑपरेटिव्ह पैलूंवर लक्ष असेल. जोखीम मूल्यांकन अभ्यासाच्या आधारे प्रस्तावित विस्तारासाठी खालील शिफारसी केल्या आहेतः

- सल्फ्युरिक ॲसिड साठवण टाकीला दुहेरी साठवण जागा आणि दुहेरी ड्रेन व्हॉल्व्ह देण्यात येईल.
- ॲसिड यंत्रणा हाताळणाऱ्या चालकाला संपूर्ण शरीर संरक्षक पीव्हीसी सूट देण्यात येईल.
- सावधगिरीची नोंद आणि आपत्कालीन प्रथमोपचार दर्शविला जाईल
- सर्व कर्मचाऱ्यांना आपत्कालीन प्रथमोपचार करण्याबद्दल प्रशिक्षण दिले जाईल.
- स्टोरेज टाकी जागेत आणि प्लँट जागेत सुरक्षित शॉवर व डोळे धुण्याची सुविधा देण्यात येईल.

पर्यावरणीय परिणामाच्या मूल्यांकन अहवालाचा कार्यकारी सारांश

मेसर्स क्लासवन ॲग्रो बायोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लि. कडून केल्या जाणाऱ्या एसएसपी (300 MTPD) आणि जीएसएसपी (200 MTPD) खत उत्पादनाच्या ब्राऊनफील्ड प्रकल्पासाठी

- सल्फ्युरिक ॲसिड हाताळणीसाठी संपूर्ण बंदिस्त प्रक्रिया स्विकारली जाईल.
- स्टोरेज टँकला डाईक भिंत उभारण्यात येईल. डाईक फ्लोअरिंग आणि आतील भिंतींच्या आतील प्रतिरोधक टायल्स आणि टाकी फाउंडेशनवर ॲसिड प्रतिरोधक पेंटिंग केले जाईल.
- टँकर अनलोडिंग प्रक्रिया तयार केली जाईल, काम परवानगी यंत्रणेची सुध्दा अंमलबजावणी केली जाईल.
- सल्फ्युरिक ॲसिड हाताळणीसाठी एसओपी तयार केले जाईल.
- टँकर चालक आणि इतर संबंधित व्यक्ती व सुरक्षारक्षकांसाठी सल्फ्युरिक ॲसिडची सुरक्षित हाताळणी व आपात्कालीन परिस्थिती यावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.
- स्टोरेज टँक परिसरात, ॲसिड च्या पाण्यावरील प्रतिक्रियेने धुके निर्माण होते आणि असे प्रकार टाळण्यात यावेत असे खबरदारीचे बोर्ड स्थानिक भाषेत प्रदर्शित केले जावेत.
- नष्ट करण्याचे योग्य माध्यम- कोरडी पावडर/वाळू नष्ट करण्यासाठी दिली जाईल. पाण्याचा वापर करू नका. आग आणि स्फोटाचे धोके- ज्वालाग्राही नाही.
- वैयक्तिक संरक्षक उपकरणे- आपात्कालीन प्रतिसादकर्त्याने ताजी हवा पुरवणारे श्वासोश्वास उपकरण, डोळ्याचे संरक्षक साधन, ॲसिड प्रतिबंधक हातमोजे, औद्योगिक सुरक्षा बूट, गॉगल, हेल्मेट आणि रासायनिक संरक्षक पोशाख घातला पाहिजे. या पीपीई वस्तूंच्या वापराचे पुरेसे प्रशिक्षण सर्व लोकांना दिले जाईल.

प्रकल्पाचे फायदे

- एसएसपी/जीएसएसपी च्या स्वदेशी उत्पादनात त्यामुळे वाढ होईल.
- सिंगल सुपर फॉस्फेट/जीएसएसपीसाठी स्वदेशी/घरगुती बाजारातील स्थिरता त्यामुळे कायम राखली जाईल.
- प्रकल्प भारत सरकारच्या नूतनीकरणक्षम उर्जा निर्मिती मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण आणि पालन करेल.
- यामुळे खतांची आयात काही प्रमाणात कमी होईल आणि राष्ट्राच्या विदेशी चलनात बचत होईल.
- या प्रकल्पात शून्य-द्रव निष्कासन प्रकल्पाचे पालन केले जाते. या प्रकल्पासाठी अगदी थोड्या प्रमाणात ताज्या पाण्याची आवश्यकता आहे आणि त्यातून अगदी कमी प्रवाहाची निर्मिती होते.
- प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणार आहे.
- यामुळे शेतकऱ्यांना रासायनिक खते सहजपणे उपलब्ध होणार आहेत.
- एकूण प्रकल्प खर्चापैकी 1% म्हणजेच 17 लाख कार्पोरेट पर्यावरण जबाबदाऱ्यांसाठी (सीईआर) खर्च करण्याचा त्यांचा प्रस्ताव आहे. किशोरवयीन मुलींचे संरक्षण, विविध कृतींना पाठिंबा देणे-जसे की

मुलींचे शिक्षण, व महिलांचे व्होकेशनल प्रशिक्षण/महिलांसाठी आयटीआय, खेळ, शिक्षण, सांडपाणी व्यवस्था आणि ग्रामपंचायतींच्या सल्ल्याने गावाच्या जमिनीवर सामुदायिक वृक्षारोपण अशा सारखी सामुदायिक विकासाची कामे कंपनी आजूबाजूच्या गावांमध्ये हाती घेणार आहे.

पर्यावरण व्यवस्थापन योजना

टिकाऊपणासाठी ईएचएस धोरण प्लँट द्वारे अवलंबिले जाईल. पर्यावरण व्यवस्थापन योजना आणि ओएचएसएएस मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याकरता प्लँटमध्ये स्वतंत्र ईएमपी कक्ष, अग्नीशमन व सुरक्षा कक्ष आणि व्यावसायिक आरोग्य केंद्र उघडले जाईल.

प्रस्तावित प्रकल्पाची एकूण किंमत आहे रु. 17.07 करोड (1707 लाख). संबंधित खात्याकडून सर्व मंजुरी मिळाल्यानंतर बांधकामाला सुरूवात केली जाईल. बांधकाम आणि यंत्रसामुग्रीची स्थापना सुरूवात केल्यानंतर 12 महिन्यांच्या आत संपवली जाईल.

प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनाचा भांडवली खर्च अंदाजे रु. 235 लाख आहे. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पर्यावरणीय नियंत्रण आणि सुधारणा उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी वारंवार होणाऱ्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी दरवर्षी रु. 65 लाख देण्यात आले आहेत. क्लासवन सीपीसीबी आणि एमओईएफ व सीसी यांनी दिलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करेल.